# रेणापूर नगरपंचायत निवडणूकीसाठी काँग्रेस पक्षाच्या प्रचाराचा शुभारंभ

## शहरात निघालेल्या काँग्रेसच्या पदयात्रेला मतदारांचा मोठा प्रतिसाद; रेणापूर झाले काँग्रेसमय

**लातूर/हरीराम कुलकर्णी :** लातूर जिल्ह्यातील रेणापूर नगरपंचायत पंचवार्षिक निवडणुकीसाठी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ बुधवार दि १९ रोजी येथील ग्रामदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुका देवीची आरती व महेबुब सुभानी दर्गा येथे शहरातील कॉग्रेस पक्षातील जेष्ठ नागरीकांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उमेदवारांच्या प्रचाराचा प्रारंभ करण्यात आला. यानंतर शहरात पदयात्रा काढून चौका चौकातील विविध मंदिरात श्रीफळ वाढवण्यात आले यावेळी रेणापूर शहरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे





यावेळी रेणापूर शहरातील १७ प्रभागातील कोंग्रेसचे निरीक्षक व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार माने अर्चना प्रदीप (राजू), नगरसेवक काळे प्रदीप सुधाकर, राठोड कांताबाई हिरामण, अकनगिरे पुजा प्रशांत, चक्रे अजयकुमार भिवा, भोकरे गोविंद प्रभू, कातळे शीतल अतुल (अश्विनी), मोटेगावकर सचिन अनुरथ, शिंदे राजश्री संतोष, पठाण यास्मीन रहिमखॉ, शेख रजियाबी पाशामियॉ, इगे इंदुबाई पुंडलिक, पनुरे मिनाक्षी भूषण, चव्हाण गजेंद्र मनोहर, राठोड पुजा विलास, सौदागर (कलाल) सुजाता बाबू, कोल्हे संतोष तुकाराम, थावरे गणेश श्रीमंत यांच्यासह कॉग्रेस पक्षाचे आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते

**पदयात्रेने रेणापूर करांचे लक्ष वेधले**

यावेळी रेणूका देवी मंदिरात दर्शन घेवून शहरात काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ माने यांच्यासहित १७ उमेदवार व काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक यांनी पायी पदयात्रा काढत लोकांचे आशिर्वाद घेतले ठिकठिकाणी नागरिकांच्या वतीने काँग्रेस उमेदवारांचे स्वागत करण्यात आले ही पदयात्रा खंडोबा मंदीर, महादेव मंदिर, रजिया बाबा दर्गा, हनुमान मंदिर, बालाजी मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदीर येथे श्रीफळ वाढवण्यात आले. या पदयात्रेत मतदारही मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणुकीत सकारात्मक वातावरण निर्माण करून विकासाच्या मुद्द्यांवर जनतेचा विश्वास जिंकण्याचा निर्धार यावेळी उमेदवारांनी व्यक्त केला. सामाजिक ऐक्य, मूलभूत सुविधा आणि पारदर्शक प्रशासन यांना प्राधान्य देण्याचा संकल्पही उमेदवारांच्या वतीने करण्यात आला .

## विलासराव देशमुख फाउंडेशन स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे भव्य इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धा

### २१ व २२ नोव्हेंबर रोजी लातूरमध्ये थरार

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ (DBATU), लोणेरे यांच्या अधिपत्याखाली विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ व २२ नोव्हेंबर २०२५ रोजी विलासराव देशमुख फाउंडेशन स्पोर्ट्स ग्राउंड, न्यू एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

डीबीएटीयू अंतर्गत असलेल्या सर्व संलग्न महाविद्यालयांचा या 'मेगा स्पोर्ट्स इव्हेंट' मध्ये सहभाग असणार आहे. यावर्षीची ही क्रीडा स्पर्धा भव्य, उत्साहवर्धक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

शुभारंभ सोहळा

स्पर्धेचा शुभारंभ सोहळा २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास श्री. प्रवीण सरदेशमुख (सदस्य, कार्यकारी परिषद, उ्ह-ढण, लोणेरे),श्री. किरण जाधव (विश्वस्त, व्हीडीएफ),श्री. समद पटेल (विश्वस्त, व्हीडीएफ),श्री. विजय देशमुख (विश्वस्त, व्हीडीएफ),सीए श्री. ऋषिकेश पाटील (संचालक, विलास बँक),श्री. रवींद्र काळे (माजी उपसभापती, विलास शुगर),श्री. संजय माने (सदस्य, नियामक परिषद, व्हीडीएफ),श्री. सचिन गायकवाड (सोलापूर विभागीय क्रीडा सचिव) यांची उपस्थिती राहणार आहे

विभागीय संघांना आमंत्रण

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे आणि क्रीडा समन्वयक प्रा. विक्रम वाघमारे यांनी लातूर, नांदेड, सोलापूर, धाराशिव, बीड, परभणी आदी जिल्ह्यांतील सर्व सहभागी पथकांना हार्दिक आमंत्रण दिले आहे.

सहभागी सर्व खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेला उपस्थित राहण्याचे आवाहन विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

## हाळी-हंडरगुळी मार्गावर सुसाट वाहने:नंबर अन् रिफ्लेक्टर नसल्यामुळे अपघाताचा वाढला धोका

### आरटीओने ऊस वाहतूक करणा-या वाहनांवर नियंत्रण आणावे, नागरिकांकडून मागणी

**उदगीर/प्रतिनिधी :** हाळी-उदगीर-अहमदपुर मार्गावर अनेक वाहने नंबर व रिफ्लेक्टरशिवाय धावत असल्याचे नागरिकांकडून गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. मोटार वाहन कायद्यानुसार प्रत्येक वाहनावर नंबर व रिफ्लेक्टर असणे बंधनकारक आहे, विशेषतः ऊस, लाकूड, वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रक, हायवा, ट्रॅक्टर आणि डंपरसाठी.

परंतु या मार्गावर असे अनेक जडवाहतूक वाहन सुसाटपणे धावताना दिसत आहेत. रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांमुळे अपघाताची शक्यता वाढते, कारण रात्री, पावसाळ्यात किंवा धुक्यात वाहन दिसण्यास अडचण येते. गाड्यांवर नियम मोडल्यास १ ते ५ हजार रुपयांचा दंड होऊ शकतो, तरीही नागरिकांच्या म्हणण्यानुसार अशा वाहनांवर कारवाई होत नाही. यामुळे नियम मोडणारे वाहनधारक बिनधास्तपणे मार्गावर वाहन चालवत आहेत. एआरटीओ उदगीर, आशिषकुमार अय्यर यांनी नागरिकांना मार्गदर्शन करत सांगितले की, वाहनधारकांनी आपल्या वाहनांवर नंबर व रिफ्लेक्टर लावणे अत्यंत आवश्यक आहे.




तसेच लवकरच हाळी-हंडरगुळी मार्गावर कडक तपासणी केली जाईल.

रिफ्लेक्टरचे फायदे : रिफ्लेक्टरमुळे कमी उजेडात वाहनांची दृष्यमानता वाढवतात, अपघात टाळू शकतात. प्रकाश परावर्तित करून समोरच्या वाहनचालकाला वाहनाची जाणीव करून देतात. केंद्रिय मोटार वाहन कायद्याने खाजगी व व्यावसायिक वाहने रिफ्लेक्टरसह असणे बंधनकारक आहे.

## गटसचिव संभाजी कसबे यांना पितृशोक

**लातूर/प्रतिनिधी :** पानचिंचोली ता. निलंगा येथील गटसचिव श्री संभाजीराव कसबे यांचे वडील, जगन्नाथ राव हरिबाजी कसबे यांचे रविवार १६ नोव्हेंबर रोजी, सकाळी ९.३० च्या दरम्यान या राहत्या गावी, वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय ८१ वर्ष होते.



दिवंगत जगन्नाथ कसबे हे कोतवाल सेवेतून, दि.३०/०६/२००४ साली निवृत्त झाले होते. त्यांनी केलेल्या उत्तम सेवा कार्याचा, पानचिंचोली पंचक्रोशीत आदर होता. गेल्या रविवारी त्यांच्या मृत्त देहावर पानचिंचोली येथील, सार्वजनिक स्मशानभूमीत सायंकाळी ५ च्या दरम्यान, अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेत नातेवाईक, स्नेही व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

त्यांच्या पःश्यात पत्नी, चार मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. या अनुषंगाने गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी पानचिंचोली येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरामध्ये कीर्तन-भजन कार्यक्रम ठेवण्यात आला असून, शुक्रवारी सकाळी ११ वाजता भोजन प्रसाद आयोजिला आहे. यास उपस्थित राहावे असे नम्र आवाहन कसबे पारिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

### स्यमंतक ..

जे अगदी जवळचे
तेचं अधिक घातक
चूक असू दे नसू दे
डोईवर बसे पातक

जो अति विश्वासक
बनवा तया हस्तक
अफवाघुसवा खोल
भडकू टाक मस्तक

कसे चाललेअंतस्थ
गुप्त बातम्या वर्तक
तालावरतीकसरती
करावे त्यांना नर्तक

भेद छेद परिवारांत
बनवा कुटुंब कर्तक
उलटे फिरवतोकाटे
होऊ शके निवर्तक

फुटत नसे सहजते
महान निष्ठा द्योतक
निष्काम सेवासादर
साक्षातनिष्ठा अर्तक

जयचंद मिळे सर्वत्र
नजरअसता शोधक
कसे उलथलेआसन
हतबलबने संशोधक

प्रयोग जरी उलटला
कुणास सोयरेसुतक
ध्येय आपले एकचि
हवी सत्ता स्यमंतक

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## प्रशिक्षण कार्यशाळेत लोकगीतांतून मतदार जागृती

### 'स्वीप' पथकाद्वारे मतदानासाठी प्रवृत्त करण्यासह निवडणुकीबद्दल जागरूकता वाढवण्याचा उद्देश

**अहमदपूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी अहमदपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहरात "स्वीप" पथकाद्वारे मतदार जनजागृतीचा प्रभावी उपक्रम राबवण्यात येत आहे. मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करणे आणि निवडणुकीबद्दल जागरूकता वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

डॉ.एस. एस.एम. प्रतिष्ठानच्या अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई रोड, अहमदपूर येथे सुरू असलेल्या मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेत एक अत्यंत प्रेरणादायी आणि मनोरंजक उपक्रम पार पडला. प्रशिक्षणाच्या सुट्टीच्या वेळेत, स्वीप कला पथकाने प्रबोधनात्मक लोकगीतांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व अत्यंत परिणामकारक पद्धतीने मतदारापर्यंत पोहोचवले. जनजागृतीचा उपक्रम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी प्रतीक लंबे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, आणि केंद्रप्रमुख शफियोद्दीन बाबन कासार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडत आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्वीप पथक प्रमुख महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंग, बसवेश्वर थोटे, नागनाथ स्वामी, विवेकानंद भंडे, आणि अर्चना माने यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनीच स्वनिर्मित गीतांतून प्रभावी जनजागृती केली.

यावेळी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप मुगळे, केंद्रप्रमुख कासार, अनिल जाधव, डॉ. कामाक्षी पवार, समन्वयक नागनाथ दहिफळे, अनिता सुरवसे, मनीषा उगिले, संगीता येंगडे, विषय सहाय्यक योगीराज आमगे, अनंत लहाने, मनीषा गुणाले आदींसह मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.

गीतांतून मतदानाचे आवाहन संविधानाने दिलेला आपला अमूल्य हक्क २ डिसेंबर रोजी मतदान करून नक्की बजवा! फक्त आपणच नव्हे, तर आपल्या नातेवाईकांना आणि मित्र-मैत्रिणींनाही मतदानाचे महत्त्व पटवून सांगा आणि त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करा. लोकशाही टिकवण्यासाठी आणि चांगले नेतृत्व निवडण्यासाठी प्रत्येक मताचे किती महत्त्व आहे, हे सोप्या शब्दांत आणि ओघवत्या चालींमध्ये समजावून सांगण्यात आले. कलापथकाच्या स्वनिर्मित आणि जोशपूर्ण गीतांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. या कार्यक्रमाद्वारे मतदानाच्या राष्ट्रीय लोकउत्सवात प्रत्येक नागरिक, मग तो प्रशिक्षक असो वा प्रशिक्षणार्थी, याने सहभाग घ्यावा, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले.



अहमदपूर - येथे टिपू सुलतान जयंती निमित्त राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी शहरातील टिपू सुलतान चौक येथे टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यावेळी त्यांच्या समवेत अहमदपूरचे माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल, प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, उपसरपंच सूरज पाटील, फुजेल जहागीरदार सह विविध मान्यवर उपस्थित होते.

(छाया - महेश स्वामी )

## चंपाषष्ठी सोहळ्याची उत्साहात तयारी, खंडोबा देवस्थानात यात्रेला प्रारंभ

### यात्रेची ८८ वर्षापासूनची परंपरा; २५ नोव्हेंबरला २ हजार दिव्यांची रोषणाई

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील एकमेव खंडोबा मंदिर असलेल्या खंडोबा गल्ली येथील प्राचीन श्री खंडोबा देवस्थान येथे गुरुवार २० नोव्हेंबर श्री खंडोबा यात्रा उत्सव-२०२५ ची "येळकोट येळकोट, जय मल्हार"च्या जयघोषात हर्षोल्हासात आणि चैतन्यपूर्ण वातावरणात सुरूवात सुरवात झाली असून श्री खंडोबा देवस्थानच्या यात्रा महोत्सवाची ही परंपरा तब्बल ८८ वर्षांपासून अखंडितपणे सुरू आहे.

शहरातील बसवेश्वर महाविद्यालयासमोर लातूर गावभाग परिसरातील खंडोबा गल्ली येथे प्राचीन खंडोबा मंदिर आहे. स्व. बसवनप्पा खुब्बा यांना श. के. १८४९ साली खोदकाम करता श्री खंडोबाची मूर्ती सापडली. यावेळी एक ओटा तयार करून याठिकाणी या मूर्तीची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून याठिकाणी श्री खंडोबा देवाची पूजा अर्चना केली जाते. या मंदिरात देवाच्या डोक्यावरील मुकूट हा जेजुरी येथील खंडोबा देवस्थानने दिलेला आहे. दरम्यान प्रतिवर्षी चंपाषष्टीनिमित्त श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान साजरा केला जातो. यंदा २० नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत यात्रा महोत्सव आयोजित करण्यात आला. ज्या पद्धतीने नवरात्रीत देवीचे ९ दिवस असतात, त्याच पद्धतीने चंपाषष्ठी ६ दिवसांचा सोहळा असतो. या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता खंडोबा मंदिरात घटस्थापना करून महाआरती आणि अभिषेक करण्यात येणार आहे. यात्रा महोत्सव कालावधीत दररोज संध्याकाळी देवाची आरती, अभिषेक करण्यात येतो. प्राचीन काळापासून या उत्सवामध्ये विविध समाजाचा सहभाग असतो. श्री खंडोबाचा आवडता नैवेद्य असलेला रोडगा, वांग्याचे भरीत, कांद्याची पात असा नैवेद्य श्रींना दाखवण्यात येतो. उत्सव काळामध्ये तळी उचलण्याचा विधी करण्यात येतो. या उत्सव काळातील महत्वाचा दिवस चंपाषष्टीच्या आदल्या दिवशी म्हणजे मंगळवारी, २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मंदिरातील गाभारा, मंदिर परिसर हा साधारणतः २ हजार दिव्यांनी प्रकाशमय करण्यात येणार आहे. त्याचबरोबर श्री खंडोबाची उत्सव मूर्ती आणि मुकूटाचे २ दिवस भाविकांना दर्शन घेता येणार आहे. खंडोबा मंदिर हजारो भाविकांचे श्रद्धास्थान ऐतिहासिक वारसा लाभलेले पुरातन असे लातूर शहरासह जिल्ह्यातील एकमेव श्री खंडोबाचे मंदिर असून हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मागील अनेक वर्षांपासून चंपाषष्टीनिमित्त श्री खंडोबा देवस्थानचा उत्सव साजरा होत आहे. या महोत्सव काळात हजारो भाविक दर्शनासाठी येतात. यंदाही मोठ्या उत्साहात हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून भाविकांनी मोठ्या संख्येने याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री खंडोबा मंदिराचे विश्वस्त पुष्पराज खुब्बा यांनी केले आहे.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६